

# हि त गु ज

## २०२४ दिवाळी विशेषांक

## मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटा





**मराठी मंडळ कमिटी**
**२०२२-२०२४**

**अध्यक्ष:**
अमिता पेणकर

**उपाध्यक्ष:**
विशाखा कोकाटे

**कोषाध्यक्ष:**
नैना शिरोडकर

**सांस्कृतिक सचिव:**
केतन कुलकर्णी
मिथुन जाधव
अश्विनी भोसले
प्रमिला जाधव

**संपर्क सचिव:**
महेश चिमणपुरे
स्नेहल मुळे
प्रविणा कुलकर्णी- पाठक

**शाळा सचिव:**
मृदुला वडके

**हितगुज संपादिका:**
अदिती बिस्वास
अवनी सावरकर-शेंड्ये

## अनुक्रमणिका


संपादकीय : अवनी सावरकर - शेंड्ये, अदिती बिस्वास

अशी पण असते मैत्री! : जयश्री मुळे

ये शाम कुछ अजीब सी : ऋचा सावरकर

स्नेहबंध : स्वामिनी बाबतीवाले

आठवणीतली कलाकृती : स्वरदा नवले

अविस्मरणीय सहल : अमोल दांडेकर

पुस्तक परीक्षण (झिम्मा) : शिल्पा साठे

टेस्ला कॅम्पिंग : वासंती मुदकण्णा

उल्लेखनीय कामगिरी : अनीश सोहोनी

कलाकौशल्य : अंजली भुरे, कल्याणी कुवळेकर, अर्पिता थत्ते

जीवन : अनुपमा नेरुरकर

तू माझा प्रिय : रसिका राऊत

वसा : शुभांगी काळे

क्षण : प्रविणा पाठक

WUYYOV! : विनोद पाध्ये

कालिंदी खाल - एक दशावतारी ट्रेक : रवींद्र भागवत

सिंहगडाच्या पायथ्याची पक्षीसंपदा : नितीन मुळे

गुळोबा - लोप पावत चाललेले खेळ : श्रद्धा कदम

उत्सव माझ्या दारी: नगरकर, राऊत, थत्ते, कुवळेकर, मुळे, भुरे, दांडेकर, पाठक, कुलकर्णी, गुंड, बरीदे, नवले, जोशी

छोट्यांच्या दुनियेत : मिहिरा जोशी,आर्या पाठक, श्रुजा सुजन कदम, रिद्धिमा जोशी, आरव गुंड, शौर्या पाठक

मराठी शाळा : मृदुला वडके

सेवाभावाचे महत्व : मिलिंद सोहोनी

वार्षिक अहवाल : अमिता पेणकर

मुखपृष्ठ चित्र : अंजली भुरे, रिद्धिमा जोशी



# संपादकीय



**अवनी सावरकर**

**अदिती बिस्वास**

नमस्कार मंडळी,

सर्वात्मका शिवसुंदरा; स्वीकार या अभिवादना;
तिमिरातुनी तेजाकडे; प्रभू आमुच्या ने जीवना...

गेल्या काही महिन्यातल्या या देशात, मायदेशात, आणि जगभरात घडणाऱ्या अनेक घटनांचे अवलोकन करताना, शाळेत शिकलेली ही प्रार्थना मनात आल्यावाचून राहत नाही. तसे म्हणायला गेले तर बदल हा निसर्गाचा आणि जीवनाचा स्थायीभाव आहे; मग चांगला असो की वाईट किंवा वैयक्तिक आयुष्यातला असो की सामाजिक! अर्थात अशा बदलत्या वातावरणात शाश्वतता देणारे काही दिवसही असतात - आणि त्यातीलच आपल्या कुटुंबियांसोबत साजरा केलेले दीपावलीचे हे काही दिवस. या वर्षीच्या दीपावलीच्या निमित्ताने आपणा सर्वांना पुढील वर्षातील बदलांना सामोरे जाण्यासाठी, तिमिरातुनी तेजाकडे प्रवास कायम ठेवण्यासाठी मनापासून शुभेच्छा!

दिवाळीच्या फराळाच्या पदार्थांची गोडी अजूनही जिभेवर रेंगाळत असतानाच आम्ही सादर करत आहोत या वर्षीचा मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटाचा दिवाळी विशेषांक - आपले आवडते हितगुज! दरवर्षीप्रमाणेच यंदाही तुम्हा सर्व लेखकांनी, छोट्या कलाकारांनी दिलेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल आम्ही विनम्र आभारी आहोत. या विशेषांकात आपल्याला विविध विषयांवरील लेख जसे की पर्यटन वर्णन, निसर्ग वर्णन, पक्षी वर्णन, विविध कविता, पुस्तक समीक्षण, कलाकौशल्य, आणि छोट्यांचे अनोखे उपक्रम असे बरेच काही वाचायला मिळेल.

ऋचा काकूंचे तरल शब्द डोळ्यासमोर निसर्गाचा आविष्कार उभा करतील तर शिल्पाचे समर्पक शब्दातले 'झिम्मा' या पुस्तकाचे समीक्षण तुमच्या वाचनाच्या यादीत एक भर नक्की टाकेल. अमोल आणि वासंती यांचे लेख अमेरिकेतल्या वेगळ्या सहलींचा अनुभव देतील आणि रवीने वर्णन केलेले दशावतारी अशा कालिंदी खालचे गिर्यारोहण अंगावर रोमांच उभे करेल! त्याचसोबत प्रविणा, शुभांगी, अनुपमा, आणि रसिका यांच्या कविता तुम्हाला भावतील यात शंकाच नाही. यंदाच्या 'छोट्यांच्या दुनियेत' आणि 'उत्सव माझ्या दारी' हा छायाचित्रांचा संग्रहही तुम्ही नक्की वाचा. आरवच्या आगळ्या वेगळ्या 'plant library' या उपक्रमाबद्दल त्याची पाठ थोपटायला विसरू नका. आर्या, मिहिरा, श्रुजा, रिद्धिमा यांच्या चित्रकलेला पण तुमचा भरघोस प्रतिसाद मिळेल अशी आशा करते!

चला तर मग, वाट कसली बघताय? छान असा एक कोपरा, संध्याकाळचा एखादा मंद दिवा, दिवाळीचा कुरकुरीत काही फराळ, एक वाफाळता चहाचा कप, आणि हा हितगुज चा दिवाळी विशेषांक! अंक कसा वाटला किंवा तुम्हाला काही बदल सुचवायचे असतील तर नक्की अभिप्राय कळवा. पुन्हा भेटूच, पुढच्या वर्षी, वसंत बहारच्या एका नवीन हितगुजच्या अंकासोबत!



**अदिती बिस्वास**
**अवनी सावरकर - शेंड्ये**



# अशी पण असते मैत्री !



'मैत्र' हे नेहमी दोन जीवांचे असले पाहिजे असा नियम नाही. या विश्र्वात 'भूतां परस्परे जडो, 'मैत्र' जीवांचे ' हे ज्ञानेश्र्वरांनी आपल्या विश्र्वात्मक ऐक्याच्या 'पसायदानात' सांगून ठेवले आहे. त्या अनुषंगाने सर्व जीव प्राणीमात्राबरोबर माणूस अद्भुत, अनाकलनीय अशा निसर्गाशीही मैत्री करु शकतो. तर अशी मी निसर्गवेडी निसर्गाने बहाल केलेल्या 'इंद्रधनुष्य' या अलौकिक, नयनरम्य अशा देखण्या मित्राच्या प्रेमात नेहमीच पडते.

हा मित्र मला क्वचितच भेटतो. पण भेटतो तेंव्हा आनंदाची उधळण होते; नेत्राचे पारणे फिटते. शुभशकुनाची नांदी होते. त्याच्या दर्शनाने मन आनंदून जाते. त्याच्या कमानीखाली मोर बनून नाच करावसा वाटतो. वर्षातून याची भेट फार फार तर चार पाच वेळाच होते पण ती खूप आल्हाददायक असते. या मित्राच्या येण्याने श्रावणमास खूप संगीन होत असतो.
वर्षात्रृतुत रिमझिम पावसानंतर काळे ढग बाजूला झाले की रवीकिरणे दिसताक्षणीच या माझ्या मित्राचे आकाश व्यापून टाकणारे सप्तरंगी इंद्रधनुचे भव्य दिव्य रूपात दिमाखाने आगमन होते.

लहानांपासून मोठ्यापर्यंत सारे नाचू गाउ लागतो. या इंद्रधनुचा दुहेरी गोफ तर दृष्ट लागण्यासारखा सुंदर असतो. त्याचे नयनरम्य रुबाबदार दिसणे लुभाउन जाते . मी स्वतः या मित्राच्या अगदी जवळ जाउन त्याच्या मैत्रीचा निखळ आनंद घेतला तो अमेरिकेतील 'नायगारा फॉल 'च्या भेटीमधे. अविस्मरणीय असा तो 'इंद्रधनुषी' सप्तरंगानी नटलेला दुग्धमिश्रीत जलधारांनी कोसळत असलेला नायगारा फॉल ! काय मनोरम दृष्य होते ते! त्याच्या कक्षेत उभे राहुन छबी घेण्याचा मोह अनावर झाला. चिंब भिजलेलो असतांना या जादूई किमयागाराला प्रत्यक्ष जवळून अनुभवतांना विलक्षण आनंद होत होता . दिव्यत्वाची प्रचिती येत होती. क्षणभरही या मित्राला दूर करू नये असे वाटत होते.

भारतात असतांना तिथल्या उंच इमारतींमुळे या मित्राचे दर्शन जरा दुरापास्त होते पण अमेरिकेत आकाश जरा जवळच भासते. ते इथल्या टुमदार बंगल्यांच्या रचनेमुळे असावे. त्यामुळे इथे या मित्राचे दर्शन सहज घडते. एप्रिल ते ऑक्टोबर महिन्यात मी सात आठ वेळा भेटले या मित्राला, त्याच्याशी जीवाभावाच्या गप्पाही झाल्या .

ता, ना ,पि ,हि, नि ,पा ,जा या त्याच्या सात रंगांच्या प्रकाशकिरणांच्या गाण्याने जीवनावर उमटणारे पडसादही रोचक असतात. ही सप्तरंगातील सप्तसुरांची छेडलेली तार हृदयी कायम झंकारत राहते. विषवृत्तातील याचा सुबक आकारही मनोवेधक असतो. याचे देखणेपण आकाशीच्या सौंदर्यात भर टाकते. नभांगणाची व्याप्तीही अचंबीत करते. चातकासारखी वाट पहायला लावणारा हा माझा मित्र मला चैतन्याची अनुभूती देत राहतो. माझ्यातील बालपण जागे करतो.
याची देही याची डोळा अनुभवलेला हा 'इंद्रधनुषी' 'मैत्रेय' छायाचित्रांसहित संग्रहित केला आहे.

निळ्या नभी इंद्रधनु दिसला
मोद मनी जाहला
'मैत्र' जीवाचे हे माझे
त्रैलोक्याचा स्वर्ग भासे !



**जयश्री मुळे**



# ये शाम कुछ अजीब सी



आजचा दिवसच खूप गरम.. खूप तापलेली उष्ण कोरड्या वाऱ्यांची सकाळ. घरातील temprature 24 डिग्रीला सेट करून ठेवलंय,पण डेक डोअर उघडले की झळा जाणवतायत. उन्हं कलती झाल्यावर सुद्धा लाही लाही होतेय.
घरात निवांत बसणे एव्हढे एकच करता येतंय आत्ता तरी. मी उगाचच खिडकी जवळच्या सोफ्यावर बसून बाहेर बघत्ये. ऊन पूर्ण नाहीसे झालेय आत्ताच्या क्षणी... आणि कोणत्याही क्षणी अंधाराच्या धारा जमिनीवर येतील अशी संध्याकाळ. रस्त्यावर एकही चिटपाखरू नाही,मंद पावलांनी अंधाराचा पदर डोईवर घेऊन मदालस सांज खाली उतरतानाचे दृष्य मी डोळे भरून बघतेय.

आणि अचानक हवा बदलली..वाऱ्याच्या भिरभिरत्या गतीचा भोवरा कधी झाला कळलंच नाही. माझ्या अंगणातले झाड बुंध्यापासून हलायला लागले, आमच्या गल्लीतली सगळीच झाडे अशी भुतासारखी डोलायला लागली, झाडाची फांदी न फांदी मोजून घेता येईल अशा वेड्या वाकड्या फांद्या हलायला लागल्या, कुठला तरी प्रचंड कल्लोळ वातावरणात निर्माण झाला, पश्चिम दिशा जणू कृष्ण डोहासारखी काळीकुट्ट झाली आणि मग सुरू झालं पावसाचे थैमान, झाडाच्या आडोशाला लपलेल्या पाखरांचा जीव अगदी पोटात गोळा यावा तसा झाला. त्यांच्याही डोळ्यात भय साठलं एखाद्या फुत्कार टाकणाऱ्या नागिणी प्रमाणे पाऊस आवाज करत कोसळत होता, विजांचे आसूड ओढले जात होते, हे सगळं तांडव साधारण 15 मिनिटे चालले असेल...

आणि अचानक पाऊस,एखादे बटण बंद करावे तसा थांबला. एखादा खोड्या करणारा,उचापती मुलगा एकदम शांत बसावा तसा.. वाराही थंडावला. आणि काय आश्चर्य! सूर्य केशरी किरणांनी चमकायला लागला, संध्येच्या सोनेरी वस्त्रावर केशरी भरत काम करायला लागला, जणू आत्ता काही अघटित घडलेच नाही, जे घडले तो भास असावा असे वाटायला लागले. आकाशात एकावर एक अशी दोन पूर्णाकृती लखलखीत रंगांची इंद्रधनुष्ये दिसायला लागली.
एखाद्या अंधाऱ्या,वरच्या शिळेतून पाणी झिरपणाऱ्या, अंगावर भयकारी रोमांच उभे करणाऱ्या बोगद्या मधून बाहेर पडल्यावर उजेडाचे लोभस जग जसे आपली वाट बघत असते अगदी तसेच काहीसे मला वाटायला लागले,एखाद्या सोनेरी पंखाच्या परीने तिच्या जादूच्या कांडीने सगळं जग सोनेरी, स्वर्णमय रंगाचे करून टाकावे तसे आकाश अगदी सोनेरी रंगाचे झाले..त्याचा प्रकाश धरतीवर परावर्तित झाला,आणि जमिनीवरच्या हिरवळीचा रंग अजूनच लखलखीत झाला...भवताली पाचुची बेटे असावीत असे वाटायला लागले...

हळूहळू तो प्रकाश केशरी झाला आणि मग गुलाल उधळल्यासारखे सारे आसमंत रंगात नाहून निघाले.
सांज आता अजूनच गहिरी झाली,तिने डोइवरचा लाल काठाचा अंधाराचा पदर उगीचच हलक्या हाताने सावरला, वारुणीने जडावलेल्या तिच्या मदिर डोळ्यातील काजळकड चमकली...तिच्या कमरेवरची अंधाराने काठोकाठ भरलेली काळी घागर जराशी हिंदकळली, तिची चाल अधीर झाली,आतुरतेने तिची पावले धरेवर पडली..आणि मग सगळीकडे काळाकुट्ट अंधार पसरला...अगदी कृष्णकाळा...



**ऋचा सावरकर**



# स्नेहबंध



स्नेहबंध ही ओळख आपुली, फुलवू आपुलकीचे मळे; स्नेहाचे हे बंध जुळले मिनीआपोलिसमुळे...
तिकडे खुशाल आपली मुले; तर इकडे आपणही खुशाल भले...

स्नेह म्हणजे आपलेपणा, मायेचा ओलावा, जिव्हाळा; त्यामुळेच का आज मुलांच्या आठवणीने आपले डोळे बोलती घळघळा...
का करावे लहान आपणच आपल्या अंतरीच्या आभाळा; यावे स्नेहबंध च्या संमेलना आणि काढावा मनाचा टाळा...

पूर्वीची व्यस्तता आता इथे नाही राहिली; गजबजलेली आपली घरे आता शांत शांत  झाली...
उठा रे मुलांनो, आवरा पटापटा, चला शाळेला चला; हा हाकारा, डांगोरा तिकडे चालू झाला...

आठवण येते त्यांनाही खूप आपली; फोनवर मिनीटे पळतात पण संपत नाही बोली...
ती म्हणे,"अगं आई, रोजचा दिवस इथे बांधलेला असतो घड्याळाला; वेळच नाही गं कोण कसे विचारायला नी बोलायला... "

"आमच्या व्यस्ततेमुळे आम्ही असे भेटू शकत नाही फारवेळा,
पण तुमच्या स्नेहबंधमुळे आम्हीपण शिकलोय एकमेकांशी सांधायला... "

"तुम्हा सर्व पालकांचे खूप कौतुक नी अभिमान आहे बरं का गं आम्हाला,
तुमचे असे संमेलन, सहली,भेटी आमच्यासाठी किती सुखदायी आहे, माहित आहे का तुम्हाला... "

"आणि खरं सांगू, तुम्ही सर्वजण भेटल्यावर आनंदच होतो गं आमच्या ग्रुपला,
जणू आम्हीच आमच्या पालकांच्या रूपे भेटतो ना एकमेकांला..."

असे अप्रूप त्यांना फार, कधी,कुठे स्नेहभेट आपली; आई, कोणकोण येणार अशी विचारणा सुरू झाली...
असे आम्ही भेटतो स्नेहसंमेलनाला,अन् सहलीला; उशीर नाही करत आपला होकार कळवायला...

**स्वामिनी बाबतीवाले**

## छोट्यांच्या दुनियेत!







**शौर्या पाठक**



# आठवणीतली कलाकृती



"तिमिरातुनी तेजाकडे" या उक्तीमध्ये अगदी चपखल बसणारी "This is us" ही American TV मालिका. खरंतर विषय गहन किंवा आगळावेगळा नसूनही, सकस पटकथेच्या वैविध्यपूर्वक मांडणीमुळे मनाचा ठाव घेणारी अशी ही हृदयस्पर्शी कौटुंबिक कथा. Rebecca आणि Jack हे सुखी जोडपं आणि त्यांची Kevin, Kate, आणि Randall ही तीन मुलं यांच्याभोवती ही गोष्ट आकार घेते. दैवाने अनपेक्षितपणे टाकलेले फासे झेलत त्यांच्या आयुष्याची उत्तरोत्तर होत जाणारी जडणघडण बघण्याचा अनुभव केवळ समृद्ध करणारा.

एकाच दिवशी जन्मलेल्या या तीन भावंडांचं संगोपन करणारे Jack आणि Rebecca हे क्षणार्धात आपलेसे वाटू लागतात. कोणाची दृष्ट लागू नये अशा या सुखी संसारात मात्र Jack च्या अकाली जाण्याने पोकळी निर्माण होते. अवघ्या सतराव्या वर्षी वडील गमावलेल्या या तीन किशोरवयीन मुलांच्या मानसिकतेवर या घटनेचे खोलवर पडसाद उमटतात. Rebecca ह्या परिस्थितीचा सामना कसा करते, कालांतराने त्यांच्या आयुष्यात येणाऱ्या व्यक्ती आणि घटनांनी नात्यांचे विविध पदर कसे उलगडत जातात आणि त्यांच्या भविष्याला कसे वेगळे वळण देऊन जातात हा प्रवास पडद्यावर अनुभवण्यासारखाच.

आयुष्याचा जोडीदार मिळवण्यात सातत्याने अपयशी ठरणारा Kevin, अतिस्थूलतेचा सामना करणारी Kate, कमालीचा संवेदनशील, कायम दुसऱ्याचा विचार करणारा Randall, कटू-गोड परिस्थितीत एकमेकांची अखंड साथ देणारी, एकमेकांसाठी घट्ट उभी राहणारी ही तीन भावंडं नक्कीच मन जिंकून जातात. व्यसनाच्या आहारी जाऊन चुकीचे निर्णय घेणारा आणि मग पश्चात्तापाच्या आगीत पोळून हताश झालेला Kevin, नात्यांच्या बंधांचे बंधनात परिवर्तन होत असतानाची Kate ची घालमेल, नात्यांचा गुंता हळुवार सोडवत नवीन नात्यांची गुंफण करणाऱ्या Randall यांच्या मनाचा थांग लागणे केवळ अशक्य. आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात अल्झायमर्स सारख्या दुर्दम्य आजाराने ग्रस्त असूनही आपलंच दु:ख कुरवाळत न बसता, "माझ्यासाठी तुम्ही तुमची आयुष्यं संकुचित करु नका, उंच भरारी घ्या, निडरपणे जगा", असा आपल्या मुलांना सल्ला देणारी धीरोदात्त Rebecca . "आपण बरेचदा वर्तमानात जगत नाही, भविष्याचा विचार करत राहतो आणि मग मागे वळून बघतांना भूतकाळातील क्षण आठवत राहतो", याची जाणीव लहान वयातच आपल्या मुलांना करून देणारा मनाने हळवा प्रेमळ Jack.

लहान मोठ्या कित्येक प्रसंगाच्या परिणामकारकरीत्या केलेल्या सादरीकरणाने कधी खळखळून हसवणारी तर कधी डोळ्यांच्या कडा ओलावणारी, सामाजिक प्रश्नांना हाताळणारी, भूतकाळ, वर्तमानकाळ, आणि भविष्यकाळातील प्रसंगांच्या आठवणींच्या भावनिक हिंदोळ्यावर मागे पुढे झुलणारी ही मालिका प्रेक्षकांना खिळवून ठेवते यात काहीच शंका नाही. यातील प्रत्येक पात्राला खडतर संघर्षातून तावून सुलाखून उजळलेले बघताना मन सुखावून जातं. २०१६ ते २०२२ च्या दरम्यान प्रदर्शित झालेली ही मालिका कायमच आनंद आणि आशेचा पुन:प्रत्यय देत राहील. काही कलाकृती मनोरंजनापलीकडे बरेच काही देऊन जातात आणि ही त्यापैकीच एक, आवर्जून अनुभवावी आणि मनाच्या कुपीत जपून ठेवावी अशी. ज्येष्ठ कवी वसंत बापट यांच्या या अजरामर ओळी याची पुरेपूर ग्वाही देतात.

गगन सदन तेजोमय
तिमिर हरुन, करुणाकर,
दे प्रकाश, देई अभय
गगन, सदन तेजोमय, गगन, सदन...

दीपावलीच्या तुम्हा सर्वांना मन:पूर्वक तेजोमय शुभेच्छा !!

**स्वरदा नवले**



# अविस्मरणीय सहल



New York राज्याच्या उत्तर मध्य भागात, उत्तरेतून सरळ दक्षिणेत अगदी एका सरळ रेषेत, कुणीतरी जमीन ओरबाडून काढावी तशी 7-8 लेक्स आहेत, त्यांना फिंगर लेक म्हणतात. यातील सगळ्यात मोठ्या Seneca लेकच्या दक्षिण अंगाला एक ओहोळ आहे (Glen Creek). हा ओहोळ उड्या मारत मारत या Seneca लेकला येऊन मिळतो. उड्या घेताना तो  2 मैलांच्या प्रवासात 19 छोटे मोठे धबधबे दाखवतो आणि जवळपास 600 फुट खाली येतो.

Watkins Glen हे गावाचं नाव आहे आणि याच नावानी इथे एक state park आहे, खूप वेगळा आणि खूप देखणा! या state park मधे Glen Creek ओहोळ अनेक आढे वेढे घेत दगड चिरत, सौन्दर्य खुलवत बघणाऱ्या अनेकांची मनं प्रसन्न करत Seneca लेक मधे विलीन होतो. आम्ही २०१३ मधे इथे आलो होतो, थोडं वर पर्यंत गेलोही होतो पण वेळेची मर्यादा असल्याने पूर्ण वरपर्यंत जाऊ शकलो नव्हतो. पण या (जुलै २०२४) वेळी पूर्ण पार्क बघायचाच असं ठरवलं होतं म्हणून सकाळी लवकर निघालो आणि संध्याकाळी ४ वाजता जग्गनाथ धाम गाठायचे होते.

सह्याद्रीची आणि पुण्याच्या आसपासच्या परिसराची आठवण येईल अशी Upstate Newची ही डोंगरराजी आहे. चढाव-उतार, शेतं, गोठे आणि सकाळच्या थोड्या  आल्हाददायक हवेचा आनंद घेत Watkins Glen गाठलं.  इथे Watkins Glen State Park नावाचाच  State Park आहे. वाटेत हे ठरलं की वरच्या भागात पार्किंग करून तिथून उतरून खाली यायचं, वर पार्क केलेली गाडी नंतर मी घ्यायला जायचं, ८०० पायऱ्या आहेत, म्हंटलं दांडेकर करूया जरा कष्ट! कारण आईला पुन्हा ८०० पायऱ्या चढत वर घेऊन जाण्यात काहीच अर्थच नव्हता. वरच्या नॉर्थ एंट्रन्सला गाडी पार्क करून शंका उरकून मी बाहेर आलो तोपर्यंत अश्विनीला माहिती मिळाली की पार्कची  एक बस आहे जी दर १५-२० मिनीटात  खाली वर करते.
मला कोण आनंद! कष्ट वाचले!! आता उतरणयात काहीच तोटा नव्हता कारण उतरून खाली जायचं आणि त्या कोच मध्ये बसून वर यायचं. Jacob’s Ladder नी खाली उतरलो, उतरताना कॅमेरा सज्ज केला, कॅमेरा सज्ज करताना लक्षात आलं, माझं फोटो घेणं खूप कमी झालं आहे, त्यामुळे कॅमेरा चे काही नेहमीचे सेटिंग आठवत नव्हते, झटापट चालू होती, लाज वाटली. ५०-६० फूट उतरून खाली आलो आणि इथून खरी Gorge Trail चालू होते. सकाळचं ऊन झाडांच्या दाटीतून वाट काढत आपलं सोनेरी वैभव पाण्याला देत होत. झाडाची हिरवी पानं सुद्धा त्या सोनकिरणात नाहात होती! पण वातावरणात आज गारवा नव्हता, उलट Humid होत त्यामुळे थोडं उकडत पण होत. उजव्या हाताला ओहोळ आणि डावीकडे trail तर कधी ओहोळ उजवीकडे आणि trail डावीकडे, दोनचार ठिकाणी कमानीचे दगडी देखणे पूल आहे. रेनबो फॉल्स कदाचित सगळ्यात मोठा आहे. याच्याजवळ एका ठिकाणी trail च्या साईडला दगडावरून पाणी पडत ते तुषार अंगावर पडतात आणि गार गार वाटतं, असा Watkins Glen आनंद घेत घेत खाली आलो. 31 मैल लांब आणि 3 मैल रुंद पसरलेल्या या लेकच्या दुतर्फा वायनरीज आहेत, शेतं आहेत, Restaurants aahet, केबिन्स आणि उत्तर तीरावर जिनेव्हा नवाच छोटं टुमदार गांव आहे. शेतजमीन, द्राक्षांचे मळे आणि लेकची सोबत असल्याने आणखीन जोडधंदे करता येतात म्हणून इथला शेतकरी सधन आहे हे इथे मात्र प्रकर्षाने जाणवलं.

याउलट आपल्या महाराष्ट्रात इतक काही बघण्यासारख आहे, पण पर्यटन कशाशी खातात हेच मुळात माहित नसलेले मंत्री पिढ्यान पिढ्या महाराष्ट्रानं पाहिले, आपल्यापेक्षा गुजरात, मध्य प्रदेशाने या क्षेत्रात बरीच प्रगती केली आहे. १० वर्षांपूर्वी नाणेघाटात गेलो होतो, २५०० वर्षांपूर्वीच रांजण आजही आहे पण शासनाला किंवा त्यांच्या अधिकाऱ्यांना त्याची जपणूक व्हावी म्हणून त्यावर एखादी घुमटी उभारावी असं वाटलं नाही. परिसराची माहिती द्यायला छोटंसं पर्यटन केंद्र उभाराव वाटलं नाही. अनेक गोष्टी करता येऊ शकतात, पण कल्पकता आणि इच्छा शक्ती हवी, असो.

वळण, चढाव-उतार निळ्या लेकच दर्शन घेत घेत, अनेक वायनरी बघत जिनेव्हा जवळ येत होतं. माझा एक घनिष्ठ मित्र आहे, लंडनला असतो धनंजय वैद्य, त्याचे मी वैद्य बुवा करून टाकले आहेत. बुवांची खूप आठवण येत होती, कारण एकूण परिसर त्याला खूप आवडला असता, हौशीनी एखाद्या वायनरीत थांबायला सांगितलं असतं ... "अबे मोट्या वायनरी आहे न बे, थांबू-थांबू, टेस्ट करू बी बे जरा". आणि नुसतं वायनरी नाही तर जिथे जिथे मला थांबावं वाटलं तिथे तिथे त्यालाही थांबावं वाटलं असतं, मला १००% खात्री आहे ४५ साल का experience है! बाकी वायनरी वगैरे विषयात माझा उत्साह कमी पडतो. असो!

जिनेव्हाला पोचलो जरा मोठं गाव, लेकच्या काठावरच्या एका पार्क मधे गेलो. मोठ्ठाली झाडं आहेत, पार्क मधे एक बेंच पाहून त्यावर विसावलो. समोर विस्तीर्ण निळा लेक. अनेक मंडळी बोटिंग, जेट स्की चा आनंद घेण्यात मश्गुल होती. भरपूर तापलं होतं, ९०च्या पलीकडे, त्यामुळे झाडाची सावली हवी हवीशी वाटत होती, घरून आणलेले शंकरपाळे आणि चिवडा उघडला आणि  खऱ्या अर्थाने विसाव्याच्या आनंद घेतला, पण जेवणाची वेळ असल्याने अश्विनीने शंकरपाळे आणि चिवडा यावर मर्यादा आणली. प्रथम भारतीय जेवण घ्यायचे ठरले होते, एक भारतीय रेस्तराँ आहे या छोट्या गावी पण review वाचून आम्ही Thai खायचे ठरवले. आई बरीच Open आहे त्यामुळे नवीन काही try करायला तिला प्रॉब्लेम नसतो, मग थाई जेवणाचा आनंद घेतला, उत्तम जेवण होत. कालचा लेचवर्थ Letchworth State Park, आजचा Watkins Glen, हा सिनेका लेक या वरून पुलंच्या 'जावे त्यांच्या देशा' तील 'उदंड पाहिले पाणी' ची आठवण झाली आणि ते शीर्षक किती समर्पक होते याचाही प्रत्यय आला. खरंच उदंड पाहिले पाणी!

बेसिल फ्राईड राईस आणि पाड थाई वर पोट भरून ज्या यासाठी इथे up state New York मधे आलो होतो तिथे जायचे होते, हिंदु स्वयंसेवक संघाचे जगगनाथ धाम!












**अमोल दांडेकर**




# पुस्तक परीक्षण



## झिम्मा - विजया मेहता

एखादे पुस्तक खूप मोठे दिसते म्हणून आपण निवांत वेळ मिळाला की वाचू असे म्हणून बाजूला ठेवतो. मात्र एकदा हातात घेतले की पूर्ण केल्याशिवाय बाजूला ठेवता येत नाही. असेच काहीसे मला “ झिम्मा” पुस्तक वाचायला सुरु केल्यावर झाले. प्रसिध्द रंगकर्मी विजया मेहता यांचे हे आत्मचरित्र. यापूर्वी मी त्यांची मुलाखत पाहिली होती, त्यांच्या तालमीत तयार झालेल्या आणि मराठी नाट्यसृष्टी गाजवणाऱ्या अनेक कलाकारांच्या मुलाखतीत “बाईंचा”, त्यांच्या नाट्य विषयक तंत्रांचा, शैलीचा, माणूस म्हणून त्यांच्या मोठेपणाचा उल्लेख ऐकला होता. नाना पाटेकर तर त्यांना दुसरी आईच मानतात. आमच्या लहानपणी बालभावन या नाट्य संस्थेची शिबिरे होत. त्याला मी जात असे. तेव्हाही त्त्यांचे नाव वारंवार कानावर येई. त्यामुळे पुस्तक अगदी निवांत, एखादा आवडता पदार्थ चवीने खावा तसेच वाचायचे ठरवले होते. आणि यावर्षी विस्कॉन्सिन डेल्स ला आगगाडीने प्रवास करायचा ठरवल्यावर पुस्तक आणि प्रवास हा समसमा संयोग जुळून आला. बाहेर रंगीबेरंगी शाल पांघरलेली शिशिरातील वनराई , हातात इतके सुंदर पुस्तक आणि कॉफी. मग काय विचारता.

झिम्मा हे शीर्षक किती योग्य होतं हे पुस्तकाची थोडी पाने वाचून झाल्यावर लगेच लक्षात आलं. आठवणींचा गोफ, फेर. आठवणींची गुंफण इतकी सुंदर केली आहे. लहानपणीची बेबी, नंतर विजू, नंतर विजू जयवंत, विजया खोटे आणि मग विजया मेहता असा दीर्घ प्रवास. वाचून वाटले की या एकाच आयुष्यात या बाईंनी ५-६ आयुष्य मावतील अशी माणसे,नाटक आणि अनुभव जगल्या आहेत. मला हा खालील परिच्छेद खूप आवडला आणि त्यात  पुस्तकाचे सार आहे असे वाटले म्हणून उद्धृत करीत आहे. “जवळ जवळ साठ वर्ष माझा नाट्यक्षेत्राशी या ना त्या कारणाने संबंध आला, आणि तो आजही टिकून राहिलाय. नाट्यक्षेत्रात वावरत असताना काही असामान्य, विलक्षण क्षण मला स्पर्शून गेले. काही क्षणांचे अविस्मरणीय अनुभव झाले. ते आजही माझ्याजवळ आहेत. त्यांनी मला संपन्न केलं. या सगळ्या काळात स्नेहबंधही पुष्कळ जडले. हया स्नेह्यांच्या, सहकाऱ्यांच्या सहावासात नवनवीन संवेदनांची, अनुभूतींची कवाडं माझ्यासमोर उघडी झाली.या सगळ्याचा एक नाजूक, पारदर्शी परंतु अतूट असा धागा माझ्या व्यक्तिगत आयुष्याच्या गोफात अल्लद मिसळून गेला. अन् त्या धाग्याच्या मुलायम, विलोभनीय छटा इतर धाग्यांवर नकळत उमटल्या. तो कोमल, पारदर्शी धागा हलकेच वेगळा करून हळुवारपणे, परंतु लक्षपूर्वक पुन्हा अनुभवावा, असं वाटलं. हे सगळं एकटीलाच कसं जमायचं ? मध्येच कंटाळाबिंटाळा आला तर? म्हणून वाचकांना सोबतीला घ्यायचं ठरवलं. म्हणजे ओघाओघाने लिहिणं आलंच. म्हणून हा लेखनाचा अट्टहास.” किती सुंदर लिहिलंय. अगदी बालपणींच्या आठवणी वाचून तो काळच जणू समोर उभा रहातो.

आयुष्य माणसांनी आणि समृध्दीने भरलेले असले तरी संकटे तितकीच आली आणि त्यांचा सामना जिद्द आणि चिकाटीने केल्याचे वारंवार दिसून येते. त्यांचे त्यांच्या आयुष्यातील स्त्रिया - त्यांची आजी बाप्पाई, आई म्हणजे बायजी, सासूबाई म्हणजे दुर्गा खोटे या साऱ्यांशी असलेले सकस नाते , ६०-७० च्या दशकात पुढे आलेल्या स्त्रियांचे अनुभवांच्या अनुषंगाने आलेले वर्णन त्या काळातही महाराष्ट्रात स्त्रिया सर्व क्षेत्रांत किती अग्रेसर होत्या हे दाखवून देतात. विजयाबाईंनी चालू केलेली रंगायन ही संस्था, तिच्यातून पुढे नावाला आलेले अनेक अभिनेते, लेखक, दिग्दर्शक यांचे रोचक वर्णन वाचायला मिळते. काश! आपणही ही सगळी नाटके पाहिली असती तर, असेही वाटून जाते. विजय तेंडुलकर, पु. ल. देशपांडे, महेश एलकुंचवार, जयवंत दळवी यांचाही समांतर झालेला नाट्यप्रवास बघता येतो. प्रवासात आपल्याला विजयाबाईंच्या खाजगी आयुष्याचीही झलक पहायला मिळते.

खरं तर हा सगळा रंगप्रवास इतका मोठा आहे की त्याबद्दल पाने भरभरून लिहिता येईल. आत्ता केवळ इतकेच म्हणेन की हा थक्क करणारा आणि थरारक आणि अद्भूत असा हा जीवनपट नक्कीच तुम्ही नक्की वाचा.

**शिल्पा साठे**



# टेस्ला कॅम्पिंग



समीकरण झालेलं आहे आणि त्याचे आणि आमचे विचार जुळत नाहीत. पण काय करणार, आज तरी टेस्ला इतकी प्रगत विजेवर चालणारी गाडी मिळणं शक्य नाही. अमेरिकेत आल्यावर घेतलेली पहिलीच गाडी होंडा सिव्हिक ‘धन्नो’ पंचवीस वर्षं झाली तरी मी वापरत होते. त्या पंचवीस वर्षांतली वीसएक वर्षं फिरतीच्या कामामुळे माझी गाडी घराच्या गॅरेजमधे असायची आणि कामाला जाण्याकरता दर आठवड्याला भाड्याची नवीन गाडी मिळायची म्हणून मी खुश होते. शिवाय कुठल्याही वस्तूचा पुरेपूर उपयोग करायचा असे माझे धोरण असल्यामुळे अतिशय जुनी गाडी वापरण्यात मला काहीच समस्या नव्हती. पण आता मात्र नवीन गाडी घ्यायलाच हवी होती. आणि ती सुद्धा विद्युत. पण कुठली? रिव्हीयन, लुसिड, पोलस्टार, मर्सिडिज, बीएमडब्लू, वगैरे गाड्यांचा सांगोपांग विचार केला आणि असं लक्षात आलं की टेस्ला मॉडेल वाय ही गाडी सगळ्यांत प्रगत गाडी आहे; यांत्रिकी दृष्टीने आणि सॉफ्टवेरच्या दृष्टीने सुद्धा. माझा नवरा अँड्रू म्हणाला, “आणि ह्या गाडीला कॅम्प मोड आहे!” हे ऐकल्यावर निर्णय घेणं अगदीच सोपं होतं.

तर अशाप्रकारे नवी धन्नो घरी आली आणि जुन्या धन्नोला डिच्चू मिळाला. पण लगेच लक्षात आलं की ही गाडी जर नीट चालवायची असेल तर मॅन्युअल वाचून सराव करावा लागणार आहे. अँड्रूला हे सगळं करायला आवडतं म्हणून हे काम मी त्याच्यावर सोपवलं आणि त्याच्याकडून टेस्ला ‘बरोबर’ कशी चालवायची हे शिकू लागले. उदाहरणार्थ ऍक्सिलरेटरवरून पाय काढला तर गाडी आपोआप थांबते; ब्रेकवर पाय ठेवायला लागत नाही. एफएसडी म्हणजे फुल सेल्फ ड्राइविंग कसे वापरायचे हेही मी शिकू लागले. पण कॅम्पिंग करण्याची खूप घाई झाली होती आणि उन्हाळा पण होता म्हणून एफएसडीचा नाद सोडून आम्ही मिनियापोलीस पासून चार तासाच्या अंतरावर असलेल्या टेम्परन्स रिव्हर स्टेट पार्कमधे असलेल्या कॅम्पग्राउंडवर जायचं ठरवलं. लेक सुपिरिअरचं दर्शन नेहमी प्रमाणे डुलूथला झालं. हा तलाव इतका सुंदर आहे की कितीही वेळा तो पाहिला तरी कंटाळा येत नाही. त्याला तलाव म्हणणं बरोबर वाटत नाही कारण सागरासारखा तो भव्य आहे. आम्ही दुपारी चारच्या सुमाराला डुलूथच्या उत्तरेला आणि लेक सुपिरिअरच्या पश्चिम किनाऱ्याला लागून असलेल्या टेम्परन्स रिव्हर स्टेट पार्क मध्ये असलेल्या कॅम्पग्राउंडवर पोचलो. पंचवीस तंबू बसतील इतक्या जागा तिथे होत्या. आमची राखीव जागा लेक सुपिरिअरला लागून होती. गाडी आमच्या जागेत लावली आणि सर्व प्रथम तिथल्या विद्युत बोर्डावर असलेल्या १२० व्होल्ट / ५० अँपिअरच्या सॉकेटमधे जोडली आणि गाडी चार्ज होऊ लागली. तंबू तर लावायचाच नव्हता, पण खुर्च्या लावल्या आणि फिरायला गेलो.

आमच्या समोरच्या जागेत एक पाटी लावलेली होती - “होम इज व्हेर वी पार्क - मार्क अँड शेरी”. गाडी शेजारी एक कॅम्पर व्हॅन उभी होती. दिवाळीत आपण दिव्यांची माळ लावतो तशी माळ अंगणात लुकलुकत होती. कॅम्पर व्हॅनच्या दाराशी एक चटई टाकली होती. कुत्र्याकरता एक आडोसा निर्माण केला होता. कॅम्पर व्हॅनला ब्युटेनची छोटीशी टाकी लावलेली होती. नक्कीच आतल्या शेगडीला ती जुळवलेली असणार! आतमध्ये झोपण्याची, स्वयंपाक करण्याची, आणि आंघोळीची सोय होती. मी म्हटलं, “हे जोडपं रसिक दिसतं आहे”. तेवढ्यात एक वयस्कर पुरुष आणि स्त्री बाहेर आले पण माझ्याकडे लक्ष जाताच दृष्टी वळवून निघून गेले. बहुतेक माझ्या तपकिरी रंगाचा आणि देशात निवडणुकीच्या कारणाने उफाळलेल्या वंशविद्वेषाचा हा परिणाम असावा असा विचार आमच्या दोघांच्याही मनात एकदम आला.

कॅम्प ग्राउंडला फेरी मारल्यावर असं लक्षात आलं की बहुतेक लोकांनी 'आपल्या' जागेची अशीच सजावट केलेली होती. काहींनी तर मिनेसोटाचा नकाशा पाटीवर लावला होता आणि त्यावर ते लोक कुठल्या कुठल्या कॅम्प ग्राउंडवर राहिलेले होते तिथे तिथे लाल ठिपके लावले होते. घर विकून कायम कॅम्पिंग करणारे लोक आमच्या सारख्या म्हणजे मजा म्हणून कॅम्पिंग करण्याऱ्या लोकांपेक्षा कमी होते. त्यातही जास्तीकरून लोक वयस्कर आणि गोरे होते. गोरे कदाचित आम्ही अमेरिकेच्या 'मिडवेस्ट' भागात असल्यामुळे असतील. आणि वयस्कर म्हणाल तर जणू काही गृहस्थाश्रमाच्या जबाबदाऱ्या संपवून ह्या लोकांनी वानप्रस्थाश्रमात प्रवेश केला होता. नाही तरी मुलं अठरा वर्षांची झाली की घर सोडतातच आणि आईवडिलांची जबाबदारी संपते. पण ही जीवनशैली फार एकाकी आहे असं मला वाटलं. ना कुणाशी बोलणं ना कुठे येणंजाणं. एका आरक्षणाखाली मिनसोटा स्टेट कॅम्प ग्राऊंड्सवर फक्त १४ दिवस राहता येते. म्हणजे दर चौदा दिवसांनी गाशा गुंडाळावा लागतो. उन्हाळ्यात ठीक आहे, पण बर्फ पडायला लागला की हे लोक काय करतात? 'बाथरूम ब्लॉक' कुठे आहे हे पाहून आम्ही आमची फेरी संपवली आणि जेवायला परतलो.

जसे आम्ही गाडीपाशी पोचलो आणि टेस्ला ऍपच्या मर्यादेत आलो तशी गाडी 'जागी' झाली. कुत्री कशी शांतपणे पडून असतात आणि आपला मालक जवळ आला की हळूहळू गुरगुरतात किंवा लहान हालचाली करतात तशीच ही गाडी पण वागते असं मला वाटतं. गाडीतल्या सगळ्या सॉफ्टवेर सिस्टिम्स  उत्तेजित होतात आणि मालकानं दाराच्या दांड्याला हात लावताच दार उघडायला तयार होतात. अँड्रूने गाडीतून आमची 'इंडक्शन शेगडी' बाहेर काढली आणि तिला विद्युत बोर्डावर असलेल्या १२० व्होल्ट / १० अँपिअरच्या सॉकेटमधे जोडली. शेगडी चालू केली, तिच्यावर तवा ठेवला आणि आधीच तयार करून आणलेला पीझ्झा त्यावर गरम केला. शेकोटी पेटवली आणि खुर्च्यांवर बसून पीझ्झावर ताव मारला, गार पाणी प्यायलो, दोन संत्री खाल्ली. तोपर्यंत खूप अंधार पडला होता. बाथरूम ब्लॉकला एक फेरी मारली आणि झोपण्याची तयारी करू लागलो. गाडीतल्या मागच्या दोन खुर्च्या सपाट करून त्याच्यावर अंथरूण, पांघरूण आणि उश्या घातल्या. तंबू ठोकण्याची गरज नव्हती. गाडीच्या सगळ्या खिडक्या बंद केल्या. गाडी 'कॅम्प मोड' वर घातली. गाडीचं तापमान ७० फॅरनहाईट वर ठेवलं. पार्श्वसंगीत म्हणून यूट्यूबवरचा एक पाऊस आणि वादळाचा व्हिडीओ लावला म्हणजे फक्त आवाज लावला. टेस्लाच्या कॉम्प्युटरवर शेकोटीचा स्क्रीनसेव्हर आला. गादीत पडलो. टेस्लाचे छप्पर काचेचं असल्यामुळे त्यातून आकाशाकडे आणि हलणाऱ्या झाडांकडे पाहत, वादळाच्या खोट्या गडगडाटात आणि रपरप पडणाऱ्या खोट्या पावसाच्या आवाजात झोप कधी लागली ते कळलंच नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठलो आणि गाडीबाहेर पाऊल टाकताच बाकीच्या लोकांनी दाराबाहेर चटया का ठेवल्या होत्या ते कळलं - चपलांवर दव पडून त्या ओल्या झाल्या होत्या आणि पाय कुठे ठेवावेत हे कळेना. मी लगेच पुढच्या वेळेसाठी केलेल्या यादीत 'मॅट' असे लिहिले. चहा-कॉफी वगैरे झाल्यावर मस्तपैकी गरम पाण्याने बाथरूम ब्लॉक मध्ये जाऊन आंघोळ केली. बाथरूम ब्लॉक खूप स्वच्छ होता आणि गरम पाण्याची काही कमतरता नव्हती. माझी हीच एक अट होती की फ्लश टॉयलेट आणि गरम पाणी असायला हवे. फक्त दुपारी दोन ते चार हा ब्लॉक स्वच्छ करण्याकरता बंद केला जायचा. असो. आम्ही टेम्परन्स रिव्हर फॉल्सच्या गिर्यारोहणावर गेलो. टेम्परन्स नदीच्या काठाकाठानं बरीच मजल मारली. क्षणाक्षणाला मनमोहक देखावे होते. बूट काढून आम्ही बराच वेळ पाण्यात पाय सोडून बसलो. इवलेइवले मासे आमच्या पायांशी येऊन काही खायला मिळते का हे पाहत होते. मी पुण्यात एकदा माउली हिल्सवर असलेल्या माझ्या मित्रांच्या घरी गेले होते. तिथल्या तलावात पण असलेच मासे पहिले होते त्याची आठवण झाली आणि मन भूतकाळात गेले. पाण्याचे धबधबे आणि त्यांचा आवाज सोडला तर सगळं कसं शांतशांत होतं. संध्याकाळी जेवणानंतर लेक सुपिरिअरच्या किनाऱ्यावर जाऊन बसलो.

तिसऱ्या दिवशी सकाळी उठल्याउठल्या परतण्याचे वेध लागले. सगळी आवराआवर करून आम्ही आमचा मोर्चा लेक सुपिरिअरकडे वळवला. दोनच मिनिटात किनारी पोचलो आणि पाण्याची भरती आणि ओहोटी पाहत बसॉल्ट खडकांवर फिरलो. मग काही काळ निळ्या आकाशाकडे पाहत आणि लाटांचा आवाज ऐकत उन्हामुळे गरम झालेल्या खडकांवर पहुडलो. निसर्गाशी एकरूप झालो. मन शांत झालं. तेवढ्यात आकाशात काळे ढग दिसू लागले, वारे वाहू लागले, हवेत गारवा आला, आणि लाटांची उंची वाढली. पंधरा मिनिटे अशीच गेली आणि निसर्गानं 'आज बरसायचं नाही' असं ठरवलं. काळे ढग विरले आणि सूर्य परत दिसू लागला. अर्थात ह्या लेकवर वादळांचा मोसम नोव्हेंबरमध्ये असतो म्हणून वादळाची तशी काही भीती नव्हती पण ह्या अवाढव्य तलावाने आपल्या सामर्थ्याची जरा झलक दाखवली.

परतीच्या प्रवासाला नेहमीच खिन्नतेची किनार असते. कधी ती रुंद असते तर कधी अरुंद. पण असते हे नक्की. अशा वेळेला आपल्या आप्तस्वकीयांची किंवा मित्रमैत्रिणींची गरज भासते. आम्ही परतताना गाडीत जरा गप्पगप्पच होतो. तेवढ्यात माझ्या मैत्रिणीचा मेरीचा फोन आला. तिने आमचे कॅम्पिंगचे काही फोटो पाहिले होते. ती म्हणाली, “तंबू नाही, शेकोटीवर स्वयंपाक नाही, झोपायला हवं ते तापमान, आंघोळीला न्हाणीघर आणि गरम पाणी, सगळा कारभार विजेवर - ह्याला काय कॅम्पिंग म्हणतात? त्यापेक्षा तुम्ही घरीच का नाही राहिलात?” आम्ही खूप हसलो. मेरी, तिचा नवरा, आणि त्यांची दोन मोठी मुलं दर वर्षी बॉउंडरी वॉटर्स इथे कुठल्याही आधुनिक उपकरणांचा उपयोग न करता दोन आठवडे कॅम्पिंग करतात!

**वासंती मुदकण्णा**

# Peter Jennings National award for Civic Leadership for 2024



मराठी असोसिएशनच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष, मिलिंद सोहोनी आणि अमिता सोहोनी यांचा मुलगा अनीश याला शैक्षणिक आणि सामाजिक कार्यातल्या उत्तम कामगिरीबद्दल २०२४ चा Peter Jennings पुरस्कार मिळाला. अनीश हा १७ वर्ष Plymouth चा रहिवासी होता आणि आता Chicago मध्ये राहत असून One Million Degrees या सेवाभावी संस्थेमार्फत Chicago मधील गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी मिळवून देण्यासाठी कार्यरत आहेत. Minnesota च्या मराठी मंडळींकडून तुझे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा, अनीश!

**अनीश सोहोनी**

## कलाकौशल्य







**कल्याणी कुवळेकर**





**अंजली भुरे**





**अर्पिता थत्ते**



# जीवन

जीवन आहे नितांत सुंदर
तूच करावयाचे ते सुखकर
सुंदर स्वप्ने जपण्यासाठी
एकांतात कुरवाळण्यासाठी

व्यक्ती किती भेटता सुंदर
मैत्रीत मग होई रूपांतर
सुंदर वृक्ष, हिरवे तृण
तृप्त पिऊन मी ते अमृतकण

सुंदर गाणी , नृत्य , अभिनय
मी श्रोता , प्रेषक तन्मय
सुंदर चित्रे , कलाकुसर
शोधते मला मी त्यात निरंतर

सुंदर मग हे जग भासते
निराशा, दुःख पार पळवते
एकच आयुष्य देवा तू मज दिले
ते मी तव सांक्षीने सुंदर केले.

**अनुपमा नेरुरकर**



# तू माझा प्रिय

मी कधीच नाही म्हणत नाही तुला
कारण तू आहेस तसा
सगळ्यांना हवा हवासा
कडक आहेस पण तेवढाच गोड़
तुझ्या एवढा नाही कोणी Hot
टपरी असो कि उपहार गृह
तू नेहमीच आहे हिरो
Stress मध्ये तू हवास
आनंदात तू हवास
तू आहेस म्हणून गप्पाना येते रंगत
तू आहेस म्हणून आठवणीत होते मन बेधुंद
तू सतत असतो
म्हणून जीवनाला अर्थ आहे
तुझ्या संगतीत व्यस्त
जीवन सुद्धा मस्त आहे
केल्या असतील कविता अनेकांनी तुझ्यावर
पण माझ्यासाठी आहेस तू Extra Special
तू असलास बरोबर की
नाही लागत मला Facebook आणि Google
गुलाबी थंडी म्हणा कि रखरखते ऊन म्हणा
तुला कधीच वेळ नसतो
पण वेळेला तू मला हवास
पण वेळेला तू मला हवास
------- माझा प्रिय चहा

**रसिका राऊत**



# वसा

प्रत्येकाच्या जीवनात "आई" हा पहिला गुरू असते. आईच्या संस्काराची शिदोरी ही आयुष्याच्या शेवटपर्यंत बरोबर असते. हीच शिदोरी मी माझ्या या कवितेत व्यक्त केली आहे.

आई तुझ्या नजरेत आशीर्वादाचं चांदणं
आयुष्य हे उजळलं त्याच दिव्य प्रकाशानं ll धृ ll

तुझ्या ममतेचा टिळा शोभे माझ्या भाळावर
तुझ्या कुशीत फुलली माझ्या आशेची पाखरं
बळ मला गं लाभलं तुझ्या मायेच्या स्पर्शानं
आयुष्य हे उजळलं त्याच दिव्य प्रकाशानं ll1ll

नीतीचे हे बोधामृत लाविलेस माझ्या ओठी
शुद्ध विचारांचे मोती गोविलेस माझ्या कंठी
ईश्वराच्या भक्तीची तू ओढ मला गं दिलीस
मर्यादेची बेडी माझ्या पायामध्ये घातलीस
हाती माझ्या बांधलेस परिश्रमाचे कंकण
आयुष्य हे उजळलं त्याच दिव्य प्रकाशानं ll2ll

कधी वाटते मनाला चुकली का माझी माय!!
आदर्शाची शिकवण कलीयुगी मोल काय?
सत्य मातीमोल झालं अनीतीच्या या बाजारी
लबाडांच्या जगामध्ये धर्म पडला आजारी
त्याला जगवाया जणू  वसा मला दिला तिनं
आयुष्य हे उजळलं त्याच दिव्य प्रकाशानं ll3ll

**शुभांगी काळे**



# क्षण

काही क्षण इतके महाग असतात
मागूनही मिळत नाही
काही इतके स्वस्त असतात
केव्हा इतके कळतच नाहीत
काही आपणास नको असतात
तरीही सतत समोर नाचतात
काहींना या म्हंटलं तरी
दारावरूनच परत जातात
काही इतके सुंदर -
जाळीचे पान करून जपावेत
काहींची कुरूपता इतकी भयंकर
राक्षसही फिके पडावेत असे ,
एक ना अनेक कितीतरी
जणू मोत्यांची एक सरी
गाठ सुटण्याचा अवकाश
पसरतात नजरेपुढे सारी
पण ,
एक साम्य सर्वात
एकदा गेले कि ना येत परत
एक सत्य सर्वात
क्षण म्हणजे जीवनाचा -
शेवट, मध्य आणि सुरुवात !!

**प्रविणा पाठक**



# WUYYOV!



Wuyyov! Sounds like a strange silly word; Let you not assume it to be a fancy password
It certainly is not your friend's funny name; Nor it is a place, toy, or candy of any fame

No sir, no mam, it is not a Wuyyov deal; When a shot from a nurse makes you shake and squeal
Bleeding and swelling from a cut are never to heal; Leaving playmates in a park with terrible guilt feel

Yes sir, yes mam, Wuyyov is always fun; Full of fun you will sense like none
While in progress you could panic a ton; But you laugh and scream when it is all done

Climb up to hilltop nothing to make it slow; Simple little push and glide down the snow
Gain speed on zipline like arrow from a bow; Sudden jerk stop with burst of laughter to show

Fully cranked up red truck crashes against a wall; Wheels in air with loud big bang in a crazy fall
Grandpa drives jeep on a slick frozen lake; Sharp turn with speed is fun that isn't fake

Near driving range is a lusty slope green; Sister and I roll down nine yards clean
Bear-hugged sisters barreling down is a scene; Other kids joining us in excitement unseen

Huge heap of fall-leaves fallen on ground; To bury my sister without trace and sound
Let grandma panic as sister cannot be found; Sudden popping from a pile is fun all around

By now, you know Wuyyov is not a riddle; Funniest fun with a wonderful sizzle
Occurs all places without costing a nickel; Wuyyov is everywhere let us enjoy it for real



विनोद पाध्ये






# कालिंदी खाल - एक दशावतारी ट्रेक

जेव्हा जॉर्ज मॅलोरीला (एडमंड हिलरी नाही) कोणी तरी विचारलं की तुम्ही डोंगर का चढता? मॅलोरीने उत्तर दिलं - "Because it's there"! पण माझं कारण थोडं वेगळं आहें. ट्रेकिंग ही अशी ऍक्टिव्हिटी आहे की यात स्पर्धा नाहीं - थोडं गोल्फ सारखं - तुमचं यशापयश हे कुणा दुसऱ्यांवर अवलंबुन नसतं - फक्त तुम्ही, डोंगर आणि पंचमहाभूतं! शाळा कॉलेज पासूनच मला ट्रेकिंगची आवड - पण मग संसार, कामानिमित्त जगप्रवास करता करता तीस वर्षं कशी निघून गेली कळलंच नाही. कोविड मधून बाहेर पडत शेवटी २०२२ साली पुन्हा एकदा मी डोंगरात गेलो - उत्तराखंडातली फुलारा रीज - आणि जाणवलं की इतकी वर्ष आपण एका आनंदापासून वंचित राहिलो आहोत. ठरवलं की पुन्हा भ्रमंती चालू करायची. माझ्या कॉलेजचा हायकिंग जोडीदार - मिलिंद भिडेशी बोललो - त्याने सुचवलं की त्याच्या कंट्रीसाईड अडव्हेंचरच्या एव्हरेस्ट बेस कॅम्प (EBC) ट्रेकला जॉईन कर. मे'२३ मध्ये EBC आणि मग दुसऱ्या मित्रांबरोबर गंगबाल - काश्मीर ग्रेट लेक्स असे दोन ट्रेक झाले.

२०२४ मधे काय करायचं असं काही ठरलं नव्हतं. कदाचित अन्नपूर्णा बेस कॅम्प, नाही तर एखादा छोटा ट्रेक किंवा काहीच नाही. जानेवारी मध्ये भारतात गेलो असतानाच अचानक मिलिंदचा; ग्रुप लीडर किरणचा SMS आला - "रवी, "कालिंदी खाल" ट्रेकला चल". म्हटलं – "विचार करतो". इंटरनेट वर ट्रेकबद्दल वाचलं - पास आहे १९,५०० फुटावर , ४-५ दिवस १६,५०० फुटावर कॅम्प. मिलिंदला विचारलं ट्रेक बदल, तर म्हणाला पहिले ३-४ दिवस त्रास आहे पण मग ठीक आहे (पूर्णपणे खोटं होतं ते 😡) जर EBC मॅरेथॉन ट्रेक म्हटला तर कालिंदी खाल डेकॅथलॉन आहे. एक दिवस मोठ्या शिळांवर चढ तर एकदा खडकाळ उतरण, भसकन पाय खड्ड्यात जाणाऱ्या हिमनद्या, कधी खळखळून वाहणारे नदी नाले ओलांडणे तर कधी ढासळणाऱ्या दरीमधून उतरणे आणि हे सर्व ४००० ते ६००० मीटर उंचीवर. पण एकदा जायचं ठरवल्यावर अमेरिकेत माझ्या घराच्या आसपास छोटे ट्रेक करून सराव आणि मुख्य म्हणजे स्टॅमिना वाढवण्याचे आणि पायाचे स्नायू मजबूत करायचे व्यायाम सुरु केले.

अखेरीस तो दिवस आला आणि आमचा प्रवास गंगोत्रीपासून चालू झाला. आम्ही सहा जण ट्रेकर आणि आमचा लीडर किरण. आम्हा सहा जणांना सपोर्ट करायला १८ पोर्टर, ३ कूकस अँड ३ गाईड्स. हो तुम्ही बरोबर वाचलंत - एका माणसासाठी तीन मदतनीस!! हा ट्रेक जरा वेगळाच आहे. एकूण सतरा दिवसातल्या १२ दिवसात ना काही आसरा - ना मोबाइल रेंज - ना रस्त्याच्या बाजूला मॅगीचे स्टॉल. तेव्हा विंचवासारखं सर्व बिऱ्हाड पाठीवर - नशिबाने पोर्टरच्या पाठीवर 🙂 रोजचा आमचा कार्यक्रम होता ६-७-८. सकाळी ६ला उठायचं, ७ला डफेल बॅग तम्बूबाहेर, ब्रेकफास्ट आणि ८ ला चालायला चालू करायचं. रोज ६ ते ७ तास चालणं, मधली विश्रांती धरून, बहुतेक दिवशी ५-६ किलोमीटर पण शेवटचे दोन दिवस १०-१२ किलोमीटर चालणं झालं. इतक्या उंचीवर खडतर आणि विरळ हवेच्या वातावरणात चढत चढत, तासाला साधारणतः एक ते सव्वा किलोमीटरच प्रगती होऊ शकत असे. सुमारे तीन साडेतीन पर्यंत पुढच्या कॅम्पसाईटला पोचायचो. पाच वाजता दुपारचा चहा - नाश्ता, साडेसातला डिनर आणि साडेआठ पर्यंत गुड नाईट. रात्री १-२ पर्यंत चांगली झोप लागायची पण नंतर बाथरूम ब्रेक आणि मग अर्धा - एक तासाच्या डुलक्या काढत सकाळ होण्याची वाट बघायची.

गंगोत्री ते चीरबासा, भोजबासा, गोमुख - तपोवन ह्या प्रवासाला तीन दिवस लागले - तशी सरळ वाट, बाजूला भागीरथीचा रुद्र प्रवाह. रस्त्यात अनेक साधू, म्हातारे - तरुण यात्रेकरू सगळे भेटतात. एक कुटुंब असं भेटलं की धड पायात बूट नाहींत, घरचेच कपडे, कुठे चाललो आहोत याचं जास्त ज्ञान नाही, तंबू तर नाहीतच. त्यात दोन ८ आणि १० वर्षांची मुलं. पण पोचले! माणसाची श्रद्धा किती प्रबळ असते त्याचा असा अनुभव मला पहिल्यांदाच आला. तपोवन म्हणजे एक मोठं पठार, साधारण ८ ते १० क्रिकेटची स्टेडियम्स बसतील एवढं. समोरच शिवलिंग, बाजूला नंदी आणि पाठीमागे मेरू पर्वत आणि दुसऱ्या बाजूला लांबवर भगीरथ १ ते ४ ही शिखरं. इथे एका बाबांचा आश्रम आहे आणि येणारे यात्रेकरू तेथेच थांबतात.

आम्ही दोन दिवस तपोवनलाच होतो कारण दुसरा दिवस होता acclimatization चा (नवीन हवामानाशी किंवा परिस्थितीशी शरीराला जुळवून घेण्याची क्रिया). गिर्यारोहणात, विशेषतः ४००० मी नंतर ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊ लागते. शरीराला याची सवय करावी लागते नाहीं तर हाय-अल्टीट्युड सिकनेसचा धोका असतो. डिमॉक्स सारखी औषधं असतात पण एक उपाय म्हणजे ‘Climb Higher,Sleep Lower’. ह्याचा अर्थ दिवसभरात आणखी कमी ऑक्सिजन असणाऱ्या उंचीपर्यंत चढून जायचं आणि रात्री वस्तीसाठी पुन्हा खाली, जास्त ऑक्सिजन असलेल्या जागेपर्यंत उतरायचं. म्हणजे गिर्यारोहकाला तुलनेने ऑक्सिजन जास्त असलेल्या वातावरणात चांगली विश्रांती घेता येईल आणि शरीराला कमी जास्त ऑक्सिजनशी जुळवून घ्यायचा सरावही होईल. "दगडापेक्षा वीट मऊ" म्हणतात तसंच काहीसं. म्हणूनच एक किंवा दोन दिवस acclimatization साठी राखीव असतात. आम्ही साधारण ६०० मीटर वरती चढून मेरू आणि कालिंदी पर्वतांच्या बेस कॅम्प पर्यंत जाऊन परत कॅम्प साईटला आलो. पुढच्या दिवशी प्रवास नंदनवन कॅम्पसाईटकडे. प्रवास कठीण होता. संपूर्ण रस्ता पूर्ण ढासळलेल्या हिमनदी (ग्लेशियर) वरून. खरं म्हणजे त्या वाटेला रस्ता म्हणणं म्हणजे अतिशयोक्तीच, कारण कुठं पाऊल वाट अशी नाहीच. असं वाटत होतं की दगडाच्या खाणींमधून चाललो आहोत. जवळ जवळ अकरा वेळा असे छोटे मोठे डोंगर पार करता करता आम्हाला सहा तास लागले. अंतर काही फार जास्त नव्हतं फक्त पाच किलोमीटर. नॉर्मली डोंगरावर चढताना दमायला होतं पण आयुष्यात पहिल्यांदाच उतरताना दमछाक झाली कारण सगळी शक्ती जीव वाचण्यात खर्च होत होती. कधी कुठला दगड सरकेल ह्याची शाश्वती नाही - आणि फक्त छोटे दगडच नाही, मोठे मोठे दगडही - याची भीती. पायाखालची जमीन सरकणे हा वाक्प्रचार ऐकला होता ते प्रत्यक्षात अनुभवायला मिळालं. थोड्याफार छोट्या किरकोळ दुखापती वगळता आम्ही सुखरूप





पुलंचं एक वाक्य आहे की “चिमुकल्यांचा एक खास देव असतो, जो त्यांना कधीच धोक्यात पडू देत नाही.”, मला वाटतं गिर्यारोहकांचाही असाच कोणी पाठीराखा असावा आणि अशा खडकाळ दुर्गम जागांमध्ये तुम्हाला भस्मचर्चित, वाघाचं कातडं पांघरून आपल्या गणांबरोबर भटकणारा शंकरच पाठीराखा पाहिजे, ब्रम्हा विष्णू नाहीत. पुढचा टप्पा वासुकी ताल. रस्ता नंदनवन सारखाच पण इथे एक नवीनंच प्रकार - ढासळलेल्या कड्याच्या मातीतून दोराचा उपयोग करत वरती चढायचं, तेही साधारण ५०००मी उंचीवर. वरती पोचल्यावर विचार आला की आपण आता अगदी सुभेदार तान्हाजीरावांचे मावळे झालो आहोत आणि आता पुढे जाणं हाच एक मार्ग आहे कारण परत फिरणं जवळपास अशक्यच वाटत होतं. पुढचे दोन दिवस खडा पत्थर आणि श्वेत ग्लेशियर गाठण्यात गेले. "रस्ता" तसाच दगडांचा, कडयाच्या बाजूने जाणारी वाट जी पुढच्या वर्षी नक्कीच ढासळलेली असणार. दोन्ही कॅम्पसाईट अगदी छोट्या दगडांनी भरलेल्या. जागा कितीही साफसूफ करून तंबू लावले तरी एक दोन खडे स्लीपिंग बॅग मधून टोचायचेच रात्री. कॅम्पसाईटची उंची साधारण १७५००-१८००० फूट. थंडी प्रचंड वाढली होती आणि रात्री बाथरूमला जायचं म्हणजे तयार होऊन तंबूबाहेर पडणे म्हणजे दहा मिनिटांचं दिव्य असायचं.

पुढच्या दिवशी एकदाचे आमच्या सर्वात उंचावरच्या कॅम्पसाईटवर पोचलो तो म्हणजे कालिंदी खाल चा बेसकॅम्प. येथे पोचण्याचा रस्ता बराचसा बर्फातून होता. दोन्ही बाजूला सुंदर हिमपर्वत आणि दूरपर्यंत पसरलेल्या हिमनद्या. ही कॅम्पसाईट म्हणजे मुंबईतल्या एखाद्या 1BHK एवढीच होती. आज आम्ही साधारण ६ वाजताच झोपायला गेलो कारण पुढचं दिवस खूप मोठा असणार होता. आम्ही सुमारे साडेतीन वाजता उठून सकाळी साडेचार वाजता चालायला सुरुवात केली. अर्ध्या तासात बर्फ लागलं मग वाटचाल अजूनच हळू झाली. सरळ वरती चढणंही कठीणच होतं म्हणून नागमोडी वळणं घेत अगदी हळू हळू प्रवास चालू झाला. आणि हे सर्व साधारण साडेसतरा हजार फूट उंचावर. अशा ठिकाणी श्वासावर ताबा ठेवत, अगदी हळू हळू पावलं टाकणं आवश्यक असतं. अगदी रोजच्या जीवनात नाही एवढी विचारपूर्वक पावलं टाकत.

बर्फाच्या पठारावर तुम्हाला अंतराचा अंदाज येत नाही आणि मग कंटाळा यायला सुरवात होते. याला उपाय म्हणजे आपल्या मेंदूला कशाततरी व्यग्र ठेवणे. प्रत्येकाची वेगळी पद्धत असणार, मी आकडे मोजतो - एक पासून १०० पर्यंत. दम नाही लागला तर पुन्हा १ ते १०० नंतर ५ मिनटं विसावा. या वेळेस जरा जास्तीच त्रास होता म्हणून मनात एक नवा विचार आला - आपला देह आणि बाहेरचं जग सर्व एकाच वैश्विक चेतनेचा भाग आहें - खरं म्हणजे हा जड़ देह हलत नाही तर फक्त क्वांटम पातळीवर रेणूंची हालचाल होत आहे - काहीच शक्ती खर्च न होता आणि मेंदूवर तर अगदीच ताण नाही. असले विचार यायला लागले म्हणजे कदाचित विरळ वातावरणाचा डोक्यावर परिणाम झाला असावा. 🙂




अशी मजल दरमजल करत शेवटी आम्ही साडेआठ वाजता कालिंदीखाल खिंडीत पोचलो, उंची ६००० मी (१९,५०० फूट). समोरच कमेंट अबी गमीन , मुकुट व माना शिखरं आणि सतोपंथ ग्लेशिअर ज्यातून अलकनंदा नदीचा उगम होतो. थोडा वेळ थांबून, फोटो वगैरे झाल्यावर उतरणीचा प्रवास - आणखी नवीन दिव्य - १ किलोमीटर लांब हिमनदी ओलांडणे. कालिंदी खाल ला फार वेळ न थांबता लगेच निघालो कारण ऊन वाढल्यावर, हिमनदीचा प्रवास फारच कठीण होतो, दर ५-१० फुटांनी पाय खड्ड्यात जातो. आणि 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' म्हणावं असंही नाही कारण आपल्या अगदी पुढच्या माणसाच्या पावलावर तंतोतंत पाय ठेवावा तर तोच पाय २-३ फूट खोलात जातो. एकदा तर मी साधारण ६-८ फूट खोल क्रेव्हस (भेगेत) पडलो - हातात काठी होती ती वाकडी केली आणि कसे बसे दोन्ही हात दोन्ही बाजूला टेकवून लटकलो - कोणी तरी आधार देऊन बाहेर काढेपर्यंत. तेवढ्या वेळात स्वर्ग आणि पृथ्वी ह्यांच्यामध्ये लटकलेल्या त्रिशंकूची अवस्था अनुभवायला मिळाली. पुढचे दोन तास असेच गेले आणि शेवटी जरा खडकाळ पठार लागले.

पण अंतर अजून बरंच होतं - पॅक लंच खाऊन पुन्हा प्रवास चालू - चालत चालत शेवटी दुपारी ३:३० वाजता राजपडाव कॅम्पसाईटला पोचलो - उंची १६,५०० फूट, आजचा एकूण प्रवास जवळ जवळ १२ तास, ११-१२ किलोमीटर. एकच दिलासा की कमी उंचीवर आल्याने श्वास घ्यायला त्रास कमी झाला होता. पुढचे दोन दिवस अलकनंदाच्या किनाऱ्या किनाऱ्याने प्रवास. यावेळेस दशावतारातला नवीन प्रकार म्हणजे नाल्यांची पात्रं ओलांडणे. खोली जास्त नाही पण पाण्याला ओढ खूप. ३-४ जणांची मानवी साखळी करून जपून जपून ८-१० फूट अंतर ओलांडायचे. एकदोनदा बूट काढून पात्र ओलांडायचा प्रयत्न केला पण पायाला खडे बोचत होते आणि पाणी थंडगार. म्हणून पुढची ५-६ पात्रं बूट घालूनच पार केली. पात्रं ओलंडताना विशेष त्रास झाला नाहीं पण बुटात पाणी शिरले आणि लक्षात आलं की बूट वॉटरप्रूफ असल्यामुळे बुटात शिरलेलं पाणी आतच भरून राहिलं - लहानपणी पायात गमबूट घालून चालताना होतं तसंच = ' इकडे आड तर तिकडे विहीर 🙁' पुढचा पडाव अर्वताल आणि मग घसतोली. या रस्त्यावर आम्हाला पहिल्यांदाच आमच्या ग्रुपशिवाय नवीन लोकं भेटली. घसतोलीला भारतीय सेनेचा कॅम्प आहे - इंडोतिबेटन बॉर्डर पोलीस (ITBP) आणि आसाम रायफल. त्यातल्या आसाम रायफलच्या जवानांना कालिंदी खालला जाऊन रेकी करायला पाठवले होते. घसतोली कॅम्पपासून भारत चीन ची सीमा २०-२५ किलोमीटरवर म्हणून येथे खासगी गाड्यांना प्रवेश नाही. आर्मीवाल्यांशी बोलून आमच्या गाईडने परवानगी काढली आणि आम्ही माना (भारतातले पहिले गाव) मार्गे बद्रीनाथला पोचलो - संपूर्ण प्रवास १6 दिवस , ८० किलोमीटर आणि खूप आठवणी. माझे गिरीप्रेमी मित्र भेटले की विचारतात - काय रे कालिंदी खाल ला जाऊ का? मी सरळ सांगतो की बिलकुल जाऊ नका कारण रिस्क रिवॉर्ड रेशिओ अगदीच चुकीचा आहे, आणि महत्त्वाचं म्हणजे 'There is no escape hatch''. ते हसतात आणि म्हणतात ठीक आहे. पण मला माहित आहे की त्यातल्या काहींनी नक्कीच कालिंदी ची स्वप्नं बघायला सुरुवात केली असणार!

**रवींद्र भागवत**

# सिंहगडाच्या पायथ्याची पक्षीसंपदा



गेल्या वर्षी भारतात गेलो तेव्हा दोन वेळा सिंहगड परिसरात जायचा योग आला. एकदा गडाच्या पायथ्याशी फक्त Bird photography साठी, आणि एकदा गडावर माझ्या मुलाला गड दाखवायला! दोन्ही वेळा फोटोग्राफीची हौस भागवून घेतली. सिंहगडाच्या पायथ्याशी valley परिसरात माकडं, वेगवेगळे पक्षी भरपूर प्रमाणात आहेत. अगदी एकाच ठिकाणी बसून राहिलात तरी कमीत कमी ४-५ वेगवेगळे पक्षी दिसतात! त्यातही अगदी सेलिब्रिटी पक्षी म्हणजे Paradise Flycatcher (स्वर्गीय नर्तक)! सेलिब्रिटी असल्याने मला "तो" काही सहज दिसला नाही, पण त्याच्या बायकोने मात्र छान फोटो काढून घेतले. त्याबरोबरच मी जन्मात कधीही न पाहिलेले आणखी काही पक्षी बघितले. या पक्ष्यांची मराठी-इंग्लिश नावं खूप गमतीदार आहेत! यातलीच काही उदाहरणे -

**Indian White-eye:** मराठी नाव "**चष्मेवाला**"! (पिवळसर हिरव्या रंगाचा, डोळ्यांना पांढऱ्या काड्यांचा चष्मा लावून बसलाय असं वाटणारा छोटासा पक्षी! मिनिसोटामध्ये आढळणारा Kinglet नावाचा पक्षी बहुतेक याचा भाऊ असावा!)



**Ultramarine Flycatcher:** मराठी नाव "**नीलसागर**"! (बहुतेक या Flycatcher प्रजातीने मराठी नावं ठेवणाऱ्या माणसाला लाच दिली असणार!! नीलसागर काय... स्वर्गीय नर्तक काय!! बुलबुल बिचारे गरीब... द्याल ते नाव गोड मानून घेतात!)



**Coppersmith**: मराठी नाव "**तांबट**"! (या पक्ष्याचा तांबे या धातूशी काय संबंध आहे ते माहित नाही. आकाराच्या मानाने चोच थोडी ओबडधोबड, पण अंगावर रंगीबेरंगी ठिपके मस्त!)



**Paradise Flycatcher**: मराठी नाव "**स्वर्गीय नर्तक"**! (नर अतिशय सुंदर पांढऱ्या रंगाचा झगा घालून उडतोय असं वाटतं, आणि मादी बिचारी मळके तपकिरी कपडे घालून पाण्याला जात असते!)



**Red-whiskered Bulbul**: मराठी नाव "**शिपाई बुलबुल**" किंवा "**नारद बुलबुल**"! (कोण ठेवतो ही मराठी नावं???)



**White-spotted Fantail**: मराठी नाव "**ठिपकेवाला नाचरा**"! (नावाप्रमाणेच शेपटीचा पिसारा पंख्याप्रमाणे फुलवणारा सुंदर छोटासा पक्षी!)



**Red-vented Bulbul**: मराठी नाव "**लाल बुडाचा बुलबुल**"! (आता एवढं स्पष्ट नाव असल्यावर अजून काय सांगणार... बिचाऱ्याने खूप मिरच्या खाल्ल्या असतील पूर्वी!)



**नितीन मुळे**



# गुळोबा - लोप पावत चाललेले खेळ



आमच्या लहाणपणी आम्ही गुळोबा नावाचा खेळ खेळायचो.. पुसटसं आठवतं खूप.. दिवाळीच्या वेळी लहान मुलांना जसे किल्ले बांधून दिले जायचे तसेच मुलींसाठी घरकुल बांधायचे.. म्हणजे चारी बाजूने एक एक विटांची भिंत, मधे दरवाज्याची जागा, तिथेच 2 उभ्या विटा ठेऊन दरवाजा, दरवाजाच्या आतल्या बाजूने गाडगं ठेऊन.. पाणी पिण्यासाठीचा माठ तयार करायचो.. छोटीशी चूलही त्यात असायची.. आतलं बाहेरचं व्यवस्थित शेणाने सारवून त्या घरकुलासमोर रांगोळी काढायचो. दिवाळीत तसेही शाळेला सुट्टी!मग काय घरकुलात बसून आम्ही सगळे छोट्या चपात्या ,थोडासा भात ,भाजी बनवून खायचो.. कधी कधी मोठे पण आवडीने जेवण टेस्ट करायला यायचे.. अरे वा करत कौतुक करायचे. संध्याकाळी मम्मी दिवे लावायला सांगायची तेव्हा आठवणीने आम्ही घरकुलात ठेवायचो.. याच वेळी गुळोबा (मातीचा )माणूस तयार करून त्याला खाऊ पिऊ घातलं जायचं.. पाटावर मातीने त्याला बनवून,आजूबाजूला भांडी वगैरे बनवली जायची व घवाच्या खपलीने त्याला सजवलं जायचं. काही दिवसांनी असं समजायचं कि तो गुळोबा मेला आहे. त्याला पाटावर घेऊन सगळे रानाकडच्या भागात जायचो. जाताना खाऊ घेऊन जायचो. तिथे जाऊन रडत आहोत असं भासवायचं."माझा गुळोबा मेला गं !"असं म्हणत रडण्याची ॲक्टिंग करायची. त्या गुळोबाला मातीत खड्डा करून पुरायचो त्याच्या भोवती गाणे गात.. दुखवटा संपवून.. जेवण करून घरी यायचो.

हे करण्याचा उद्देश किंवा हेतू किंवा याचं काय महत्व असेल,हे शोधण्याचा खूप प्रयत्न केला पण अर्थ काही कळला नाही.. पण हे खेळ खेळण्यात एक वेगळीच मजा असायची.. सगळे एकत्र यायचे..tv जास्त पाहिला जायचा नाही व कडाडून भूक पण लागायची.. आता अलीकडे कुणी हे खेळताना दिसत नाही.. गवळण. याचबरोबर आणखी एक खेळ म्हणता येणार नाही पण दिवाळीच्या वेळी प्रामुख्याने शेतकरी कुटुंबात, दिवाळीच्या दिवसांमध्ये घरातील बायका सडा रांगोळी काढून.. शेणाच्या गवळणी तयार करायच्या ,त्यात दळण दळणारी बाई.. पाटी घेऊन जाणारी बाई. गुरं ढोरं हे शेणाने तयार करून दाखवलं जायचं.. एकंदरीत ग्रामीण भागातील बाईमाणूस व तिचं जीवन यात असायचं.. संध्याकाळी गल्लीतील किंवा घरातील मुलं त्या गवळणीत फटाका फोडायची ,ते पाहण्याची मजा पण काही वेगळीच होती..लगोरी, सुर पाटी, गोट्या, चिंचुके, जिबल्या हे खेळ तर हळू हळू इतिहास जमा होत आहेत..

आमच्या लहानपणी हे आम्हाला पाहायला व खेळायला मिळालं हे आमचं भाग्य, या खेळांनी आमचं जीवन समृद्ध व without screen ठेवलं हे नक्की!

**श्रध्दा कदम**

# उत्सव माझ्या दारी










**अमृता नगरकर** **रसिका राऊत** **अर्पिता थत्ते** **कल्याणी कुवळेकर**

# उत्सव माझ्या दारी



स्नेहल मुळे



अंजली भुरे



प्रविणा पाठक



अश्विनी दांडेकर



केतकी कुलकर्णी



अमरजा बाबतीवाले



श्रध्दा बरीदे



स्वरदा नवले



स्वरांजली जोशी

# छोट्यांच्या दुनियेत!



मिहिरा जोशी





आर्या पाठक



श्रुजा सुजन कदम





रिद्धिमा जोशी






आरवच्या एका मासिकात वाचलेली Plant लायब्ररी ची कल्पना आम्हाला दोघांना आवडली आणि ती आम्ही उन्हाळ्याच्या सुट्टीत प्रत्यक्षात पण आणली. दर बुधवारी घराजवळच्या पार्क मध्ये आम्ही ही लायब्ररी आयोजित करायचो. या उपक्रमाला खूप छान प्रतिसाद मिळाला. आम्हाला बऱ्याच नवीन झाडांची ओळख झाली. आमच्या दोघांसाठी हा एक खूप वेगळा आणि छान अनुभव होता.

**आरव गुंड, अमरजा बाबतीवाले**

# मराठी शाळा




नमस्कार!

MAM च्या मराठी शाळेची घोडदौड ह्या वर्षी ही जोरदार सुरु आहे. २०२४-२०२५ ह्या वर्षी आपल्या शाळेत ५०+ मुलांनी प्रवेश घेतला आहे. ह्या वर्षी ही आपल्या MAM शाळेचे शिक्षक voluntarily मुलांना शिकवण्याचे काम अतिशय जबाबदारीने सांभाळात आहेत. MAM च्या ह्या मराठी शाळेच्या वाटचालीत शिक्षकांचा मोलाचा वाटा आहे.

२०२४-२०२५ MAM शाळा वर्ग पुढील प्रमाणे:
शिशु वर्ग : मराठी बेसिक, रंग, प्राणी , अक्षर ओळख; शिक्षक - राहुल कोष्टी
प्राथमिक वर्ग : मराठी बाराखडी, शब्द ओळख, लिखाण; शिक्षक - प्राजक्ता हेबळे
माध्यमिक वर्ग : शब्द, वाक्य , व्याकरण ओळख , लिखाण वाचन; शिक्षक - राजश्री पाटील, अदिती बिस्वास
पारंगत वर्ग : Advance class - जोडाक्षरे, वाक्ये, व्याकरण, गोष्टी; शिक्षक - रोहिणी माळगी
संगीत वर्ग : मराठी बालगीत, प्रार्थना, श्लोक; शिक्षक - माधुरी गोसावी





२०२३-२०२४ मध्ये शाळेने वार्षिक अभ्यासा बरोबर मकर संक्रात - सामुहिक गीत आणि ऐतिहासिक व्यक्तिरेखा, वक्तृत्व स्पर्धा, दिवाळी कार्यक्रम साजरे केले. ह्या वर्षी MAM गणेश उत्सवात मराठी शाळेच्या मुलांनी गणपती स्तोत्र सादर केले.





नेहमी प्रमाणे, तुम्हा पालकांचा पाठिंबाआहेच. इच्छुक शिक्षकांची शाळेला गरज आहे आणि तुमच्या सहकार्याची अपेक्षा आहे...

**मृदुला वडके**

# सेवाभावाचे महत्व



MAM ची स्थापना मिनेसोटाच्या महाराष्ट्रीय समुदायासाठी १९८९ मध्ये 'ना नफा सांस्कृतिक संस्था' म्हणून करण्यात आली होती. परदेशात मराठी लोकांचा एकसंघ समुदाय तयार करण्यासाठी, आणि नव्याने येऊन इथे वास्तव्य करणाऱ्या मंडळींना सहज स्थायिक होण्यासाठी मदत करण्याच्या उद्देशाने त्याची स्थापना करण्यात आली होती. मराठी सणवार, परंपरा, आणि संस्कृती यांची जाणीव राखणे आणि वाढवणे हा देखील त्याचा उद्देश आहे. निरपेक्ष व समाजप्रिय अशा सेवाभावी व्यक्तींची एक कार्यकारी समिती २ वर्षांच्या कालावधीसाठी संस्था चालवण्याची जबाबदारी घेते. १९८९ च्या स्थापनेपासून, MAM च्या सदस्यत्वात अनेक पटीने वाढ झाली आहे आणि ती वर्षभर अनेक कार्यक्रम सादर करते. यासाठी प्रत्येक कार्यक्रमादरम्यान विस्तृत नियोजन करणे आणि तो यशस्वीपणे पार पाडणे यासाठी समाजाभिमुख मराठी व्यक्तींची मदत अभिप्रेत आहे. परिणामतः अशा कार्यकारिणी समितीच्या विविध पदांवर सेवा देण्यासाठी मराठी बांधवांनी पुढे येण्याची गरज आहे. आपणहून पुढाकार घेऊन कार्यकारी समितीची जबाबदारी घेतील अशी माणसे शोधणे हे काम सोपे नव्हते. तरी सुद्धा या जिकिरीच्या शोधामध्ये किती श्रम पडतात याची मला आजतागायत कल्पना नव्हती. गेल्या वर्षी MAM च्या पहिल्या संचालक मंडळावर निवडून येण्याचे भाग्य मला लाभले. सध्याच्या समितीचा कार्यकाळ जसा संपुष्टात येत आहे, तसे पुढील द्विवार्षिक समितीसाठी सेवाभावी व्यक्तींची नियुक्ती करण्यात किती अडचणी येत आहेत याची मला जाणीव झाली. सप्टेंबर अखेरपर्यंत अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत काही वेळा वाढवूनही (हे आवाहन लिहिण्याच्या वेळेपर्यंत), समिती एका 'भावी' सचिवाच्या शोधात आहे. वास्तविक अशी पाळी येणे चांगले नाही.

सेवाभावी व्यक्तींच्या फायद्यांबद्दल आपल्यामध्ये जागरूकता कमी आहे असे माझ्या लक्षात आले. खरे सांगायचे तर, वर्षभर संस्थेसाठी काम करणाऱ्यांच्या स्वतःच्या दृष्टीने सुद्धा काही फायदा होतोच. उदाहरणार्थ:

१. संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी दिशा ठरवण्यासाठी मार्गदर्शन करणे - तुमचा दृष्टिकोन पुढील कार्यक्रम निवडण्यासाठी, भविष्यातील उद्दिष्टे ठरवण्यासाठी उपयोगात येऊ शकतो.

२. नेतृत्व क्षमता निर्माण करणे - समितीच्या भूमिका अनेकदा नेतृत्व विकास, सहयोग, आणि समस्या सोडवण्याच्या संधी प्रदान करतात, ज्या वैयक्तिक आणि व्यावसायिक अशा दोन्हीही दृष्टींनी मौल्यवान असू शकतात.

३. सामुदायिक संबंध मजबूत करणे - स्वयंसेवा सदस्यांचे संस्थेतील इतरांशी संबंध वाढवते, सामायिक सांस्कृतिक मूल्ये आणि उद्दिष्टांसाठी आपलेपणा आणि वचनबध्दतेची भावना वाढवते.

४. सांस्कृतिक प्रभाव वाढवणे - कार्यकर्त्या व्यक्तींना संस्थेच्या सांस्कृतिक मूल्यांचे जतन, प्रचार, आणि प्रगती करण्यासाठी सक्रियपणे योगदान करण्याची संधी मिळते. ही मूल्ये सद्य कालानुरूप सुसंगत आहे याची खात्री करण्यात मदत करते.

५. संबंधांचे जाळे आणि व्यावसायिक वाढ - समविचारी व्यक्तींना भेटण्याची, संबंधित क्षेत्रातील व्यावसायिकांसह नेटवर्क आणि सांस्कृतिक समुदायामध्ये ओळख मिळवण्याची संधी प्रदान करते.

६. मदतीची परतफेड - समाजसेवा हा सदस्यांना, एखाद्या संस्थेला सामाजिक मदतीची परतफेड करण्याचा एक मार्ग आहे. ज्या सामाजिक संस्थेने त्यांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम केला असेल, त्या संस्थेचे यश वाढवणे, तिचे अस्तित्व बदलत्या काळामध्ये टिकवणे, यातून कृतज्ञतेचा आनंद मिळू शकतो.

७. संसाधन वापरावर प्रभाव टाकणे - संसाधनांचा वापर कसा केला जातो याबद्दल समित्यांचा विचार समाजाला लक्षात घ्यावा लागतो. त्या योगे उपलब्ध निधी व होणारे प्रयत्न याची सांगड संस्थेच्या सांस्कृतिक उद्दिष्टांशी घालता येते.

८. संघटनात्मक स्थिरता - वचनबद्ध पदाधिकारी संस्थेला तिच्या वाटचालीत स्थिरता प्रदान करतात, हे सुनिश्चित करतात की तिचे कार्य तिच्या ध्येयाशी निगडित राहते आणि कामकाज सुरळीत चालते. MAM सारख्या उत्साही आणि सक्रिय संस्थेला पूर्ण समिती तयार करण्यासाठी पुरेसे स्वयंसेवक सापडत नाहीत ही परिस्थिती निराशाजनक आहे. अशा प्रकारच्या संधीमुळे सगळ्यांचा फायदा होऊ शकतो.

मंडळाच्या सदस्यांनी ज्या समुदायाचा ते अविभाज्य भाग आहेत त्यांना परत देण्यासाठी स्वत:हून वेळ दिला पाहिजे. ही एक मूलभूत गरज आहे आणि ना-नफा संस्थेच्या अस्तित्वाचा प्राण किंवा केंद्रबिंदू आहे. वर नमूद केलेल्या एक किंवा अधिक फायद्यांसाठी श्रमदान करणे पूर्णपणे योग्य असले तरी, मी खात्री देऊ शकतो की, माझ्यासह बहुतेकांनी, ज्या समाजाने त्यांना वर्षानुवर्षे खूप काही दिले आहे त्या समाजाला कृतज्ञतेच्या भावनेने, अंशत: परतफेड म्हणून जबाबदारी वेळोवेळी अंगावर घेतली आहे. सध्याच्या समितीने, प्रथमच, समितीवर सेवा देण्यासाठी निवडून आलेल्या यशस्वी जोडप्यांसाठी वार्षिक शुल्क न घेण्याचे ठरवले आहे. माझी कळकळीची विनंती आहे कि सदस्यांनी पुढे यावे आणि आपल्या प्रिय MAM ला पुढील वाटचालीसाठी आणि तिच्या भरभराटीसाठी मदत करावी. आम्हाला मिळू शकणारी सर्व मदत हवी आहे!

माझ्या English मधील आवाहनाचे मराठीत रूपांतर करण्याबद्दल, माझा मित्र अरविंद आपटे याचा मी आभारी आहे.

**मिलिंद सोहोनी**

# वार्षिक अहवाल २०२४



नमस्कार मंडळी,

तुम्हा सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा!

दिवाळी म्हणजे मरगळलेल्या मनाला उत्साह, आनंद, आणि चैतन्य देणारा दिव्यांचा सण. सात समुद्र पलीकडे भारता पासून जरी आपण खूप दूर असलो तरी मराठी माणसाची सण साजरा करायची हौस आपण जपली आहे. आणि या उत्साहाला आपुलकीने मराठी माणसांना जवळ करून प्रेमाच्या धाग्याने बांधणारे आपलं हे मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटा!! गेली अठरा वर्ष मी या मंडळाची सभासद आहे आणि माझ्या या माझ्या मराठी असोसिएशनला मनापासून त्रिवार सलाम!

आपले मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटा गेली ३५ वर्ष सातत्याने कला, संस्कृती आणि पारंपरिक कार्यक्रमाचे आयोजन करते आहे आणि आपण सर्व लहानथोर एका कुटुंबाचे कार्य असल्याप्रमाणे त्यात सहभागी होत आहात. त्यामुळे आपल्या मराठी बांधवांच्या सुप्त गुणांना वाव मिळतोच आहे शिवाय आपली हौस ही पुरी होत आहे. आपण सर्वांनी जर जास्तीत जास्त मराठी कुटुंबियांना मंडळाचे सभासद होण्यासाठी प्रवृत्त केले तर जास्त दर्जेदार कार्यक्रम आपण रसिकांसमोर सादर करू शकू.

गेली दोन वर्षे आमच्या कमिटीने तुम्हाला चांगले कार्यक्रम देण्याचा पूर्ण प्रयत्न केला आहे.आणि ह्या पुढची कमिटी सुद्धा तुम्हाला तसेच दर्जेदार आणि उत्तोमत्त कार्यक्रम देईल ह्यात शंकाच नाही.त्यांनाही तुमच्याकडून असेच सहकार्य सतत मिळावे हीच सदिच्छा!!

**Financials as of October, 15th 2024**

| | | Amount |
|---|---|---|
| **Opening Cash Balance as of Jan 1, 2024** | | $78,668.19 |
| **2024 Revenue:** | | |
| 2023-2024 Member fees received | $1,695.40 | |
| 2024 Non-member fees received | $2,679.46 | |
| Dandiya & Lagnabambal natak ticket sales | $4,002.42 | |
| Ganapati donations | $2,775.00 | |
| Sponsorship | $375.00 | |
| Stall revenue | $609.21 | |
| Other miscellaneuos revenue | $9.41 | |
| 2023-2024 Shala fees received in 2024 | $190.00 | |
| 2024-2025 Shala fees received | $5,721.26 | |
| 2024-2025 Member/Non-member fees received | $4,623.71 | |
| **Total Actual Revenue** | $22,680.87 | |
| *Projected Diwali revenue to be received* | *$17,000.00* | |
| **Total Projected Revenue** | $39,680.87 | |
| **2024 Expenses:** | | |
| Sankrant | $7,286.07 | |
| Holi | $1,428.76 | |
| Mandar Bhide show | $4,682.53 | |
| Vasant Bahar | $1,753.51 | |
| Picnic | $2,027.83 | |
| Ganapati | $4,468.43 | |
| Dandiya/Bhondla | $3,726.61 | |
| Lagnabambal Natak | $4,992.84 | |
| Charitable donations | $201.00 | |
| Shala | $1,880.42 | |
| Operating & administrative | $1,496.90 | |
| **Total Actual Expenses** | $33,944.90 | |
| *Projected Diwali expenses* | *$17,500.00* | |
| **Total Projected Expenses** | $51,444.90 | |
| Time Account CDs established 4/7/11 months | | $24,000.00 |
| **Projected Balance After Diwali 2024** | | $42,904.16 |

**अमिता पेणकर, अध्यक्ष**

# मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटा सांस्कृतिक कार्यक्रम

## इंडियन फेस्टिवल २०२४









IAM

लग्नबंबाळ

चान्स फौंडेशन रन





होळी

पिकनिक









गणेश उत्सव

भोंडला दांडिया







# MAM कमिटी आणि हितगुज संपादकांकडून तुम्हा सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!



शायोन आणि अदिती



अतुल, चि. अर्णव, आणि अवनी



MAM कमिटी - स्नेहल, नैना, प्रमिला, अश्विनी, अमिता, विशाखा, प्रविणा, मृदुला, मिथुन, महेश, केतन